**आदेश निशाणी क्र. ७३**
( पारीत दिनांक १८ माहे नोव्हेंबर २०२५ )

**०१.** वादीने सदरच्या अर्जाद्वारे दावा खारीज करण्याचा आदेश रद्द ठरवून त्याला दाव्यामध्ये पुढील कृती करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी केलेली आहे.

**०२.** वादीनुसार, त्याने प्रतिवादी क्र. ७ ते १० यांनी करवून दिलेले नोंदणीकृत खरेदीखताला आव्हाण दिलेले आहे. त्याला काही दस्तऐवजांचे निकाल हस्तगत झाले नव्हते; म्हणून पुरावा देता आला नव्हता आणि त्या दरम्यान दिनांक १५.१०.२०२५ रोजी दावा खारीज करण्याच्या आदेशासाठी ठेवल्या गेलेला आहे. त्याच्यानुसार, दाव्यातील मिळकतीमध्ये त्याचे हितसबंध गुंतलेले असल्यामुळे दाव्याचा निर्णय गुणवत्तेवर आणि अंतिमरित्या होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी त्याला संधी देण्यात यावी. अन्यथा त्याचे पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन येणार नाही असे नुकसान होवू शकते.

**०३.** प्रतिवादींनी सदरच्या अर्जाला आक्षेप घेतलेला आहे; परंतु त्याची कारणे दिलेली नाही.

**०४.** सदर वादीच्या वतीने वकील श्री. व्ही. आर. खवले यांना तर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. एस. एस. खरसडे यांना ऐकले.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, दाव्यामध्ये दिनांक १२.०४.२०२३ रोजी निशाणी क्र. ६१ द्वारे निश्चित केलेले आहेत आणि दोन वर्ष झालेले असलेतरी वादीने पुरावा देण्यामध्ये स्वारस्व दर्शविलेले नाही. त्यामुळे दिनांक १५.१०.२०२५ रोजी सदर न्यायालयाने दावा खारीज करण्याच्या आदेशासाठी ठेवणारा आदेश पारीत केलेला आहे. जरी वादीचे हे म्हणणे स्वीकारले की, त्याला विवाद्य जमिनीचे नोंदविलेले दस्ताचे निकाल हस्तगत झाले

नव्हते; परंतु त्यासाठी त्याला २ वर्षाचा कालावधी लागणे कोणत्याही स्थितीत विलंबाचे स्पष्टीकरण होवू शकत नाही. त्यामुळे वादीची दिरंगाई सुस्पष्ट होते. परंतु त्याच्या म्हणण्यानुसार दावा मिळकतीमध्ये त्याचे हितसबंध गुंतलेले असल्यामुळे विवादाचा निपटारा हा गुणवत्तेवर अंतिमरित्या होणे आवश्यक आहे. तेव्हा तशी संधी वादीला देणे गरजेचे आहे; परंतु त्याची दिरंगाई लक्षात घेता याबाबत त्याच्यावर परीव्यय लादणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यास धडा मिळेल की, अशी दिरंगाई त्यास महाग पडू शकते. शिवाय पुढील कालावधीमध्ये त्याच्याकडून अशी दिरंगाई होणार नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करताना वादीवर परिव्यय लादणे आवश्यक आहे आणि प्रतिवादीने आक्षेप घेतला नसल्यामुळे ती परीव्यय रक्कम शासन जमा करण्यात येईल. त्यामुळे अर्ज मंजूर करताना खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

## **आदेश**

१. अर्ज विनंती प्रमाणे रुपये ५००/— परिव्यय लादून मंजूर करण्यात येत आहे;

२. वादीने परीव्यय रक्कम पुढील तारखेपर्यंत शासन जमा केल्यावरुन दावा खारीज करण्यासाठी ठेवण्याचा केलेला आदेश रददबातल ठरविण्यात येईल आणि त्याला पुढील कार्यवाहीसाठी परवानगी दिली जाईल;

३. परिव्यय हा अर्जदार/सदर वादीवर राहील.

BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2025.11.18 18:00:18 +0530

दिनांक: १८.११.२०२५

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | R.H.Botre (Grade-II) |
| Name of Court | : | Civil Court Senior Division Bhoom Tq. Bhoom Dist.Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 18.11.2025 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 18.11.2025 |
| Order/ Judgment uploaded on | : | 18.11.2025 |